JETIR.ORG ISSN: 2349-5162 | ESTD Year : 2014 | Monthly Issue
JOURNAL OF EMERGING TECHNOLOGIES AND INNOVATIVE RESEARCH (JETIR)
An International Scholarly Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# कौटिल्याच्या आर्थिक विचारांची प्रासंगिकता

**भाग्यश्री सदाशिवराव होले.**
पीएच.डी संशोधक
मूळजी जेठा महाविद्यालय,जळगाव.

**सारांश :**

'अर्थ एवं प्रधान। अर्थ मुलं धर्म कर्मो'।

या कौटिल्याच्या प्रमुख सूत्राप्रमाणे सुखासाठी धर्म आवश्यक आणि धर्मासाठी अर्थ आवश्यक आहे. कोणतेही कार्य हाती घेण्यापूर्वी अर्थाची व्यवस्था केली पाहिजे. 'कौटिल्यीय अर्थशास्त्र' या ग्रंथाचा आवका खूप मोठा आहे. आजच्या भारतीय अर्थव्यवस्थेच्या संदर्भात व सद्यस्थितीच्या संदर्भात या ग्रंथाचे महत्व, उपयुक्तता,समर्पकता, संशोधन पत्रातून समजण्याचा प्रयत्न केला आहे. कौटिलच्या अर्थशास्त्र म्हणजे केवळ अर्थशास्त्र हा विषय नव्हता. तर अनेक ग्रंथाचे मिळून झालेला एक महान शास्त्र ग्रंथ होता. यात राजनीति, अर्थनीती, मानसशास्त्र, धर्मशास्त्र, नीतीशास्त्र, रसायनशास्त्र, युद्धशास्त्र, समाजशास्त्र इत्यादी सर्वांच्या समावेश होता. मानवी जीवनाच्या सर्व सुखाचा बोध घेण्याचा प्रयत्न करणारा हा ग्रंथ आहे. सर्व शास्त्रात अंतरसंबंध समजावण्याचा हा ग्रंथ आहे. कौटिल्याने "अर्थशास्त्र" हा ग्रंथ प्रामुख्याने राज्याचे राज्यकर्त्यांना मार्गदर्शन व्हावे म्हणून लिहिलेला हा ग्रंथ आहे.

कौटिल्याने प्रतिपादिलेली अर्थनीती व सार्वजनिक आयव्ययाचे प्रतिबिंब आपणास चंद्रगुप्त मौर्याच्या व शिवाजी महाराजांच्या राज्यात पाहयला मिळते. सध्याची परिस्थिती पूर्णपणे बदललेली आहे. सामाजिक, आर्थिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात बदल झाले आहेत. तरीही सद्यस्थितीमध्ये कौटील्याच्या विचारांची कारण मीमांसा होणे गरजेचे आहे.

**मुख्य शब्द :** कौटिल्य, आर्थिक विचार, अर्थशास्त्र, शेती, सार्वजनिक आयव्यय, कर, कल्याणकारी राज्य.

**प्रस्तावना:**

अलीकडच्या काळातील आर्थिक विचारांची ओळख व्हावी म्हणून काही प्राचीन भारतीय अर्थशास्त्रांच्या विचारांचा अभ्यास करण्यास सुरुवात आपण केली आहे. प्राचीन काळातील आर्थिक विचारांची माहिती आपणास चार वेदांतून म्हणजेच ऋग्वेद, सामवेद, यजुर्वेद आणि अथर्ववेद तसेच रामायण, महाभारत यासारख्या पुराणांमधून मिळते. 'कौटिलीय अर्थशास्त्र' हा ग्रंथ कौटिल्याने लिहिला. हा ग्रंथ भारतात व साऱ्या विश्वात अर्थशास्त्रावर लिहिला गेलेला पहिला उपलब्ध ग्रंथ आहे. हा ग्रंथ 430 पानांचा असून संस्कृत भाषेत आहे. हा ग्रंथ केवळ उपदेश करणारा ग्रंथ नाही तर या ग्रंथात राज्यशास्त्राचा शास्त्र म्हणून विचार केला आहे. आजही हा ग्रंथ टिकून आहे यातच या ग्रंथाची थोरवी आहे. हा ग्रंथ केवळ अर्थशास्त्रापुरताच मर्यादित न ठेवता समाजाला भेडसावणाऱ्या विविध समस्यांचे वर्णन यामध्ये केले आहे. कौटिल्य यांनी आपल्या ग्रंथात जागोजागी इतिहासिक दाखले देत विषयाचे विवेचन केले आहे. मानवी जीवनाच्या सर्वांगीण विचार या ग्रंथात पाहावयास मिळतो. कौटिल्याने मानवी सुखाचा मुळात जाऊन शोध व बोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. मानवी जीवनाची जे विविध पैलू आहेत त्यात अंतर संबंध समजावले आहेत. गाव आणि

खेड्याचे शासन, न्यायदान, राजस्व, सैन्य व्यवहार, शेती, व्यापार, परराष्ट्र नीती इत्यादी अनेक विषयांची चर्चा कौटील्य यांनी मांडलेली आहे. त्याच्या प्रमुख विचारांचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

**अभ्यास पद्धती :**

प्रस्तुत संशोधनपर लेख लिहिण्यासाठी द्वितीयक साधन सामुग्रीच्या साह्याने माहिती संकलित केली असून संशोधानासाठी विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर केला आहे.यात प्रामुख्याने विविध संदर्भ ग्रंथाचा वापर करून संशोधन लेख पूर्ण केला आहे.

**कौटिल्याचे शेतीविषयक विचार:**

भारत देश प्राचीन काळापासून शेती प्रधान म्हणून ओळखला जातो. त्यामुळे प्राचीन कालखंडापासुन ते आजतागायत शेतीकडे अधिक लक्ष असल्याचे दिसून येते.त्याकाळी भारतीय शेती समृद्ध होती. जमिनीची सुपीकता आणि पावसाचा अंदाज पाहून कोणत्या प्रकारच्या जमिनीत कोणते पीक घ्यावे, हे त्याकाळी सुद्धा भारतीय शेतकरी बरोबर समजत होता.कौटिल्याने त्या काळात मांडलेले विचार आजच्या काळात सुद्धा लागू पडतात. कौटिल्यानी कोणते पीक चांगले यासंबंधी उत्तर सुद्धा समर्पक दिले आहे. साळीचे पीक सर्वात उत्तम, भाजीपाला मध्यम व उसाचे पीक सर्वात कनिष्ठ असे कौटिल्य सांगतात. आजच्या शेतकऱ्यांना कौटिल्याच्या विचारांमधून अनेक प्रश्नांची उत्तरे मिळतात. त्यांच्यामते उसाचे पीक कनिष्ठ असण्याचे कारण म्हणजे त्यासाठी खर्च जास्त येतो. तसेच रोगराई जास्त पसरते. कपाशीची बी पेरण्यापूर्वी त्यावर शेण चोपडावे असे कौटिल्याने त्याकाळी सांगितले. विशेष म्हणजे आज सुद्धा ही पद्धती रूढ असून शेतकरी बियाण्याची पेरणी करताना त्यात आधुनिक औषधे लावतो. शेती उत्पादनासाठी खतांचा वापर ही कल्पना कौटिल्याला सुद्धा पूर्णपणे मान्य होती. उत्पादन क्षमता वाढवण्यासाठी हाडांचे खत, मासळी, कालवे, पाटबंधारे, नदी, तलाव, विहिरी यातील पाण्याचा उपयोग शेतीसाठी करावा, पाण्याची साठवणूक व संवर्धन करावे. म्हणजे आकाशाकडे ढगाकडे आपल्याला पहात बसावे लागणार नाही अशी कौटिल्याची धारणा होती. कौटील्याने शेतीबाबत सरकारची भूमिका काय असावी हे स्पष्ट केले. पडीत जमिनीला लागवडीखाली आणणे हे सरकारचे काम आहे. एवढेच नव्हे तर व्यापाऱ्यांच्या गैर व्यवहारांपासून शेतकऱ्यांचे रक्षण करण्यासाठी सरकारने योग्य मूल्य निश्चित करावे. तसेच जमीन लागवडीखाली न आणल्यामुळे जमिनीचे नुकसान होत असेल तर ती जमीन जमीन कसणाऱ्याला सोपवावी हा विचार कौटिल्यने मांडला. त्याच प्रकारे अनेक प्रकारच्या संपत्तीची जननी म्हणजे शेती त्यामुळे शेतीच्या संदर्भात सखोल व विस्तृत लागवड पिकांचा फेरपालन, पिकांवरील रोग, शेतीचे उत्पादन वाढवण्यासाठी खतांचा वापर, जलसिंचनाची व्यवस्था इत्यादी गोष्टी कौटिल्याच्या ग्रंथात आहे. थोडक्यात अर्थव्यवस्थेत शेतीला असणारे महत्त्व आणि आजच्या सरकारने शेतीला असणारे महत्त्व यातील साम्य आणि भेद आपल्याला ओळखता येतो.

**सार्वजनिक आयव्यय आणि करविषयक विचार:**

कौटिल्याने आपल्या आर्थिक विचारात सार्वजनिक अर्थव्यवहाररला महत्त्वाचे स्थान दिले आहे. एवढेच नव्हे तर आपल्या ग्रंथात त्याने यासंबंधी सविस्तर चर्चा देखील केली आहे. त्याच्यामध्ये देशाचा राज्यकारभार आणि इतर कार्य चालवण्यासाठी पैशाची आवश्यकता असते. तेव्हा सरकारने आपल्या खजिन्याकडे जास्तीत जास्त लक्ष द्यावे असे त्यांनी सांगितले. प्राचीन काळापासून ते अर्वाचीन काळापर्यंत 'सार्वजनिक आयव्ययाला' आर्थिक विकासाच्या दृष्टीने महत्त्व प्राप्त झाले आहे. सार्वजनिक आयव्यय आजच्या अर्थनीतीचा कणा आहे. प्रजेला कोणत्याही प्रकारची पीडा न होता राज्याने कर आकारणी करावी. शिलकीचे अंदाजपत्रक, लोककल्याणकारी राज्याची उद्दिष्टे या गोष्टी कौटिल्याच्या सार्वजनिक आयव्ययात पहावयाला मिळतात. याउलट भारत सरकारने आधुनिक पाश्चात्य अर्थशास्त्र स्वीकारून त्याआधारे सर्वसाधारण आर्थिक धोरणाचा एक भाग म्हणून सार्वजनिक आयव्ययधोरण, आर्थिक नियोजनाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी अवलंबिले. आर्थिक विकास व सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी तुटीच्या अंदाजपत्रकाचा स्वीकार सध्या केला जातो. कौटिल्याचे करविषयक धोरण विकासाभिमुख आणि प्रजाहित दक्ष होते. प्रजेला पीडा न होता राजाने करवसुली करावी असे त्यांनी सांगितले आहे. मधमाशी जशी परागाला धक्का न लागू देता मध गोळा करते त्याप्रमाणे राजाने कर गोळा करावा असे कौटिल्याने सुचवले आहे. त्यांच्या करविषयक धोरणात न्याय कर आकारणी,सशर्त कर आकारणी, शेती

उत्पन्नावर कर, कराची आधुनिक तत्वे आणि कसोट्या, कररचनेचा व्यापक व भक्कम पाया, अधिक प्रत्यक्ष कर व कमी-अप्रत्यक्ष कर इत्यादी चांगल्या बाबींचा समावेश आहे. याउलट आजचे करविषयक धोरण व यशस्वी सदोष आणि निष्प्रभ ठरत आहे. त्यामुळे आज 140 कोटीच्या भारत देशात करदाते किती कर भरतात? म्हणजेच कर चुकवणाऱ्यांची प्रचंड संख्या आणि त्यातून जमा होणारी प्रचंड बेहिशोबी मालमत्ता पाहायला मिळते. या सदोष करविषयक धोरणात सक्तीची करवसुली आहे. प्रत्यक्ष करापेक्षा अप्रत्यक्ष कराचे प्रमाण अधिक आहे. त्यात सेवा कराची भर पडत आहे व त्याची व्याप्ती वाढत आहे. शेती उत्पन्नावर कर आकारण्यात राज्य सरकार असमर्थ ठरली आहे. सरकारी खर्चाचा अत्यंत काटकसरीने व कार्यक्षमतेने वापर करण्याची निकड कौटिल्याने अत्यंत आग्रहाने सांगितली. एवढेच नव्हे तर सरकार खर्चाचा कार्यक्षमतेने व काटकसरीने वापर करणारा अमात्य म्हणून कौटिल्य भारतासमोर व साऱ्या विश्वासमोर एक आदर्श उभा आहे. आजच्या राज्यकर्त्यांना त्यांचा असा अमात्य म्हणून आदर्श घेणे जमेल, रुचेल आणि पटेल का? हा प्रश्न आहे.

सरकारी निधीचा गैरवापर टाळण्यासाठी, भ्रष्टाचार रोखण्यासाठी, सरकारी नोकरांवर करडी नजर ठेवण्यासाठी आवश्यकता आहे. कौटिल्याच्या विचारांची आज सरकारी निधीचा गैरव्यापार टाळण्यासाठी, भ्रष्टाचार रोखण्यासाठी, सरकारी नोकऱ्यांवर करडी नजर ठेवण्यासाठी आवश्यकता आहे. याचे पालन न करण्यासाठी यथायोग्य शिक्षा त्यांनी सुचवल्या आहेत. आणि विशेष म्हणजे या सर्व शिक्षा वेळोवेळी सम्राट चंद्रगुप्तांनी आपल्या सरकारी नोकरांना फर्मावल्या होत्या. याउलट स्वातंत्र्योत्तर कालावधीत सरकारी निधीची उधळपट्टी मोठ्या प्रमाणात होत आहे. आज राज्य सरकारच्या तिजोरयामध्ये खळखळाट झाला आहे. त्यामुळे सरकारी कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेवर होऊ शकत नाही. विकास कार्यक्रम, विविध प्रकल्प निधी अभावी ठप्प झाले आहेत. महसूल खर्च म्हणजे उत्पादक खर्च आणि विकासेतर खर्च व भांडवली खर्च म्हणजे विकास खर्च, विविध प्रकल्पावर झालेला खर्च, भ्रष्टाचाराने केवळ शासन यंत्रणाच नव्हे तर सारा देश सडत चालला आहे. गेल्या 75 वर्षात आर्थिक गुन्हेगारांना शिक्षा होऊ शकलेली नाही. पर्यायांने सरकारी निधीची उधळपट्टी होत आहे. भ्रष्टाचार टाळण्यात सरकारला अपयश आले आहे. आणि याचा परिणाम म्हणून काळ्या पैशाचे साम्राज्य देशात निर्माण झाले आहे. सार्वजनिक कर्जाचा उल्लेख कौटिल्याच्या अर्थशास्त्रात पहावयास मिळत नाही. राजाने पराक्रमाने आणि पुरुषार्थाने धन कमवावे, राज्य संपादन करावे व त्यांच्या राज्याचे संगोपन करावे अशी धारणा त्याकाळी होती. राज्य समृद्धीसाठी शत्रू राज्यावर आक्रमण करणे हाच मार्ग अनुसरला जात होता. श्रीमंतांकडून देणग्या घेण्याचा प्रकार मात्र प्रचलित होता. कौटिल्याच्या अर्थशास्त्राचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, सरकारकडे जी कार्य सोपविण्यात आली त्यावरून कल्याणकारी राज्याची कल्पना प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न सरकारने करायला हवा. कौटिल्याच्या काळात सामाजिक सुरक्षितता योजना अस्तित्वात नव्हती. परंतु कौटिल्याने आपल्या "अर्थशास्त्र" या ग्रंथात जनकल्याण संबंधी, सामाजिक सुरक्षिततेचे विचार मांडले आहेत. कौटिल्याने मांडलेले विचार आजच्या सामाजिक कल्याण कल्पनेशी जवळीक साधणारे आहेत. त्यांच्यामते राज्यातील अनाथ व्यक्ती, वृद्ध लोक, विधवा, अपंग इत्यादींचा आधार नसलेल्यांचे पालन राजाने करावे. तसेच गरिबांसाठी धर्मार्थ संस्था स्थापन कराव्यात, बेकारांना काम देणे हे सरकारची कार्य आहेत असा विचार त्यांनी मांडला. एवढेच नव्हे तर रोग्यासाठी औषध पाण्याची सोय करणे, प्रवाशांसाठी विश्रामगृह बांधणे, गरिबांना अन्नदान करणे हे देखील राज्याची कर्तव्य आहेत. कौटिल्याच्या मते देशावर नैसर्गिक संकट आल्यास जसे दुष्काळ पडला, अतिवृष्टी झाली तर लोकांना रोजगाराची सोय करावी, जसे आजचे सरकार रोजगार हमीसारखे कामे हाती घेत आहे. त्याचप्रमाणे अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले असेल तर सरकारने शेतकऱ्यांना मदत करावी, त्यांना मोफत बी -बियाणे खते द्यावीत. कौटील्याने आपल्या अर्थशास्त्र या ग्रंथात इ.स.पूर्व काळात शासनाने कोणती कार्य करावी त्यासंबंधी मांडलेले विचार आधुनिक काळातील कल्याणकारी अर्थशास्त्रातील विचारांशी जुळणारे आहेत आणि सध्या सरकार या विविध प्रकारच्या योजना, शेतीसाठी अनुदान, हमीभाव या माध्यमातून ही कार्य करण्याचा प्रयत्नही करत आहेत.

**निष्कर्ष**

कौटिल्याने मांडलेली कल्याणकारी राज्याची कल्पना महत्वपूर्ण आहे आणि आजच्या काळातील कल्याणकारी राज्याशी जुळणारी आहे. राजाने प्रजेचे कल्याण साधण्यासाठी काय करावे यासंबंधी यासंबंधी मांडलेले विचारही महत्वपूर्ण आहेत.

कौटील्याचा ग्रंथ अर्थशास्त्र याचा बारकाईने अभ्यास केल्यास आपणास असे दिसून येते की त्याने राज्यशास्त्राला धर्मशास्त्रापासून वेगळे करून राज्यशास्त्र एक स्वतंत्र स्थान मिळवून दिले आहे.

कौटिल्याने अर्थशास्त्रीय विचार व्यक्त करताना संकुचित दृष्टिकोन न स्वीकारता विशाल दृष्टिकोन स्वीकारला. आर्थिक विचारांबरोबरच त्याने राज्य, राज्याची निर्मिती, राज्यकारभाराची प्रक्रिया यासंबंधी व्यक्त केलेले विचार महत्वपूर्ण आहेत. त्याचे सार्वजनिक आयव्ययासंबंधीचे विचार निश्चितच महत्त्वपूर्ण आहेत. जमीन महसूल आणि आयातीत कर कशा पद्धतीने आकाराव्यात यासंबंधी मांडलेले विचार आजही मार्गदर्शक आहेत.

थोडक्यात सारांश रूपाने असे म्हणता येईल की, कौटिल्याने अर्थशास्त्र या ग्रंथात मांडलेले कल्याणकारी राज्य, राज्याची कर्तव्ये, कराची तत्वे, किंमत नियंत्रण इत्यादी संबंधीचे विचार आजच्या काळातही उपयुक्त ठरणारे आहेत. कौटिल्य हा एक सर्वश्रेष्ठ अर्थशास्त्रज्ञ तर होताच परंतु कौटिल्याच्या संदर्भात सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे सर्वसामान्य माणसाचा एक आदर्श म्हणून आजही प्रत्येक भारतीय कौटिल्य चे नाव विसरणार नाही. कारण आजही असे म्हटले जाते की, जिद्द असावी तर आर्य चाणक्यासारखी. त्याची 'शपथ', हेच त्याची जिद्द व चिकाटी. "माझा अपमान करणारया नंद वंशाचा सर्वनाश करीन, त्याच वेळी मोकळया केसांची गाठ बांधील". अशा प्रकारची नीती आजच्या राजकारणातही चाणक्याच्या कुटील नीतीनुसार अवलंबली जात असल्याचे आढळते आहे. आज बरेच राजकारणी, विचारवंत म्हणतात की, राजकारणात कौटिल्याने सांगितलेली कूटनीती सर्वश्रेष्ठ ठरते. त्याचप्रमाणे अर्थशास्त्रीय विचारांची प्रचंड शिदोरी, अनेक अर्थशास्त्रीय कल्पनांचा केलेला उपरोह कौटील्याच्या अर्थशास्त्रात सापडतो. जसे श्रीकृष्णाने अर्जुनाला गीता सांगितली व त्यातून गीता रहस्य जन्माला आले. त्याचप्रमाणे विष्णू गुप्ताने चंद्रगुप्त मोर्याला उपदेश करण्याकरिता सहा हजार लोकांची दंड निती लिहिली असे म्हटले जाते. यातूनच कौटील्याचे अर्थशास्त्र निर्माण झाले.

**संदर्भ:**


1. डॉ. कल्याण कुलकर्णी" कौटिल्यीय अर्थशास्त्र आणि आधुनिक भारतीय अर्थव्यवस्था", विहंग प्रकाशन, पुणे.
2. प्रा. र.प.कंगले " कौटिल्यीय अर्थशास्त्र", महाराष्ट्र राज्य सांस्कृति मंडळ पुणे .
3. ब.रा.हिवरगावकर, ह.अ.भावे" कौटिल्यीय अर्थशास्त्र", वरदा प्रकाशन, पुणे.
4. के. पी. एम. सुंदरम, मिश्रा, देसाई, जोशी "भारतीय अर्थव्यवस्था व भारतीय अर्थशास्त्र"
5. डॉ. वसंत दीनानाथ जोशी व लोखंडे" प्राचीन भारतीय संस्कृतीचा इतिहास" ,पुणे.
6. भा. द. खेर,चाणक्य:, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.
7. बाळशास्त्री हरदास "आर्य चाणक्य" काळ प्रकाशन, पुणे.